वाचले :- 
1. शासन राजपत्र दि.5 जानेवारी 2017.
2. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 44.
3. **श्री. अभिषेक बाळासाहेब देशमुख स्वत: व अभिजीत बाळासाहेब देशमुख यांचे ज.मु. म्हणुन, रा. ओझर, ता. निफाड, जि. नाशिक** यांचा दि. 31/12/2021 रोजीचा बिनशेती परवानगी अर्ज. व दिनांक 24/02/2022 रोजीचा अर्ज
4. म.उपमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.नामप्रविप्रा/तात्पु.अभि/मौ. ओझर ता. निफाड गट.नं.213 पै/2108 दि. 29/12/2021
5. उपजिल्हाधिकारी (समन्वय भुसंपादन) नाशिक यांचेकडील क्र. APP-1180-3164-1021-9847-14 दिनांक 02/02/2022
6. प्रशासक, ओझर नगरपरिषद, ओझर तथा तहसीलदार निफाड यांचेकडील जा.क्र.34/2022 दि. 08/02/2022
7. मंडळ अधिकारी, ओझर ता. निफाड यांचेकडील पत्र जा.क्र. 212/2022 दि. 10/01/2022
8. **श्री. अभिषेक बाळासाहेब देशमुख स्वत: व अभिजीत बाळासाहेब देशमुख यांचे ज.मु. म्हणुन, रा. ओझर, ता. निफाड, जि. नाशिक** यांचे दि.06/01/2022 व 17/02/2022 रोजीचे प्रतिज्ञापत्र / करारनामा.

---

**उपविभागीय अधिकारी निफाड**
**भाग निफाड यांचे कार्यालय**
**क्र.जमा/एन.ए.एस.आर./99/2021**
**निफाड दिनांक . 24/02/2022**

**आदेश**

अर्जदार **श्री. अभिषेक बाळासाहेब देशमुख स्वत: व अभिजीत बाळासाहेब देशमुख यांचे ज.मु. म्हणुन, रा. ओझर, ता. निफाड, जि. नाशिक** यांनी मौजे ओझर, ता.निफाड येथील ग.नं/स.नं. 213 क्षेत्र 1 हे. 83 आर + 0 हे. 14 आर असे एकुण 1 हे. 97 आर पैकी 11,800.00 चौ.मी. क्षेत्रात रहिवास प्रयोजनाकरिता शासन राजपत्र दि.5 जानेवारी 2017 प्रमाणे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, 1966 चे कलम 44 अन्वये अकृषीक अभिन्यास व बांधकाम नकाशे परवानगी बाबत विनंती केलेली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. जमा/एनएएसआर/99/2021 दि. 22/02/2022 अन्वये **रहिवास** प्रयोजनाकरिता अकृषिक सारा व रुपांतरीत कर भरणा करणेबाबत कळविले असता खालीप्रमाणे रक्कम भरणा केली आहे.

| गावाचे नाव | ग.नं / स.नं | क्षेत्र | अकृषीक प्रमाणदर रु. पैसे | अकृषीक कर रु. पैसे | जि.प. सेस रु.पैसे | ग्रां.पं. सेस रु.पैसे | रुपांतरीत कर रु.पैसे | एकुण रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ओझर, ता. निफाड | 213 | 1 हे. 83 आर + 0 हे. 14 आर असे एकुण 1 हे. 97 आर पैकी 11,800.00 चौ.मी. | 0.10 पैसे | 1,180/- | 8,260/- | 1,180/- | 5,900/- | 16,520/- |

याप्रमाणे रक्कम 0029173701 या लेखाशिर्षाखाली चलन **क्रं. MH013587914202122M** दि. 24/02/2022 भरणा केलेली आहे.

म.उपमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.नामप्रविप्रा/तात्पु.अभि/मौ. ओझर ता. निफाड गट.नं.213 पै/2108 दि. 29/12/2021 अन्वये मौजे ओझर, ता.निफाड येथील ग.नं/स.नं. 213 क्षेत्र 1 हे. 83 आर + 0 हे. 14 आर असे एकुण 1 हे. 97 आर पैकी 11,800.00 चौ.मी. क्षेत्रात रहिवास प्रयोजनार्थ प्रयोजनाचे तात्पुरत्या अभिन्यासास परवानगी /नकाशा मंजुर केला आहे.

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, 1966 चे कलम 44 अन्वये मौजे ओझर, ता.निफाड येथील ग.नं/स.नं. 213 क्षेत्र 1 हे. 83 आर + 0 हे. 14 आर असे एकुण 1 हे. 97 आर पैकी 11,800.00 चौ.मी. क्षेत्रात रहिवास प्रयोजनार्थ अकृषीक परवानगी खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

**अटी शर्ती**

1. अर्जदार यांनी नियोजन प्राधिकरणाच्या नियमानुसार आवश्यक त्या परवानग्या घेणे बंधनकारक राहील. तसेच सहाय्यक संचालक नगररचना / कार्यकारी अभियंता, यांनी मंजुर केलेल्या अभिन्यासातील खुली जागा (ओपन स्पेस) तसेच रस्ते स्थानिक प्राधिकरणाकडे वर्ग करणे आवश्यक राहील.
2. सदर मिळकत ही नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात समाविष्ट असल्याने त्यानुसार अर्जदार यांना अटी व शर्ती बंधनकारक राहील. तसेच विकास परवानगी (अभिन्यास व बांधकाम नकाशे मंजुरी) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
3. अधिकारी अभिलेख व जमिनीच्या मालकी हक्काबाबत तसेच इतर हक्काबाबत भविष्यात काही विवाद उदभवल्यास व त्यामध्ये तथ्य आढळल्यास तसेच मालकी हक्काबाबत काही गंभिर स्वरुपाच्या कायदेशिर त्रृटी आढळल्यास,न्यायालयाचे काही निर्णय झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

4. सदर मिळकतीबाबतं भविष्यात सदर जमिन भोगवटादार वर्ग-2/न.अ.श, नश, ना.ज.क.म, देवस्थान इनाम, व इतर कोणत्याही नियंत्रित सत्ता प्रकारची असल्यास तसेच शासनास अधिभार देय असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेणे तसेच त्या वेळच्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार शासनास देय होणारा नजराणा / इतर रकमा भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
5. सदर आदेश अर्जदार यांचा चालु 7/12 व प्रतिज्ञापत्रांच्या अधिन राहुन दिलेला आहे.
6. सदर आदेश अर्जदार यांनी प्रकरणी सादर केलेले प्रतिज्ञापत्र / करारनामा यांस अधिन राहुन दिलेला आहे.
7. प्रशनांकित मिळकतीच्या इतर हक्कात कोणतेही वित्तीय बोजे असल्यास त्यास अर्जदार / मिळकत धारक जबाबदार राहतील यास अधिन राहुन सदरचे चलन मंजुर केले आहे.
8. प्रशासक, ओझर नगरपरिषद, ओझर तथा तहसीलदार निफाड यांचेकडील पत्र जा.क्र.34/2022 दि. 08/02/2022 मधील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.
9. मिळकतीचे मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नाशिक यांचेकडून मंजुर बांधकाम / विकास परवानगीप्रमाणे इतर सर्व संबंधित विभाग यांचेकडून बांधकाम नकाशे प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील.
10. म.उपमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.नामप्रविप्रा/तात्पु.अभि/मौ. ओझर ता. निफाड गट.नं.213 पै/2108 दि. 29/12/2021 चे पत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड

**उपविभागीय अधिकारी,**
**निफाड भाग निफाड**

**प्रति,**
**श्री. अभिषेक बाळासाहेब देशमुख स्वतः व**
**अभिजीत बाळासाहेब देशमुख यांचे ज.मु. म्हणुन, रा. ओझर, ता. निफाड, जि. नाशिक**
**प्रत**
1. **तहसिलदार - निफाड** यांचेकडेस मुळ संचिका पा.क्रं.1 ते सह अभिलेखात जतन करणे व योग्य कार्यवाहीकामी रवाना. याशिवाय आणखी असे की, परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यानंतर विहीत नमून्यामध्ये तसेच अकृषिक प्रयोजन नोंदवहीमध्ये बिनशेती सा-याबाबत वसुलीच्या दृष्टीने योग्य ती नोंद घ्यावी. शासन राजपत्र दि.5 जानेवारी 2017 अन्वये 60 दिवसाच्या आत परवानदार यांना योग्य त्या नमुन्यात सनद करुन देण्यात यावी. तशी अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यात याव्यात.

**टीप**-परवानदार यांनी मोजणी फी चलन **क्रं.** MH013540785202122M दि. 24/02/2022 रोजी रक्कम **रु. 60,000/-** भरली असून ती प्रकरणात सामील केली आहे.

2. **उपअधिक्षक भूमि अभिलेख, निफाड** यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
3. **म.महानगर नियोजनकार,नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नाशिक/ सहाय्यक संचालक नगररचना नाशिक यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.**
4. **प्रशासक, ओझर नगरपरिषद, ओझर तथा तहसीलदार निफाड**
5. **तलाठी - ओझर, ता. निफाड जि.नाशिक** यांना अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेणेकामी रवाना.

**उपविभागीय अधिकारी,**
**निफाड भाग निफाड**